# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०५/०८/२०१६.

**१) घरातील सोन्याचे दागिने व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी १४.३० ते २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी आशीष शंकर खराबे वय ३५ वर्ष, रा. ट्रेझरी कॉलोनी पांढराबोडी रोड भंडारा हा कुटुंबासह घराच्या समोरील दाराला ताला लावुन चौदावीचे कार्यक्रमाला गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन स्टोअर रुम व बेडरुम मध्ये असलेल्या लोखंडी आलमारीमधुन सोन्याचा डोरला २ ग्रॅम व नगदी ३०,०००/—रु. असा एकुण ३५,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) ट्रकची मोटार सायकलला धडक, दोन गंभिर जखमी . :—**

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी १६.०० वा. दरम्यान फिर्यादी अतुल बंडु तिजारे वय २६ वर्ष, रा. बहीरंगेश्वर मंदीर मागे खाम तलाव चौक भंडारा हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ४० एई ४२५२ ने गाडीवर डब्बल सिट बसवुन खात रोड कडुन शितला माता मंदीर कडे जात असतांना समोरुन येणा—या आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल धडक देवुन मोटार सायकल स्वार विकास मोहन सतीकोसरे वय ४० वर्ष, दोन्ही रा. चाचेर यांना गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८भादंवि सहकलम १८४,१३४(अ)(ब),१८७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन पैश्याच्या वादावरुन मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी २०.३० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन पैशाचे देवाण घेवाण वरुन फिर्यादीचे घरासमोर जावुन फिर्यादीस शिविगाळ केली व फिर्यादी ही घरासमोर निघाली असता आरोपी क्र १ ने फिर्यादीचा "उजवा मनगट धरुन तुझी बेईज्जती करतो" असे बोलला असता फिर्यादीचा दीर राजकुमार शहारे हा भांडण सोडविण्यास आला असता आरोपी क्र. २ ने त्याचे डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने व आरोपीतांनी शिविगाळ करुन मारपिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम३५४(अ)(१)(४),३२४,५०४,५०६ भांदवि व अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक ०५/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०५ केस, तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व इतर वाहनांवरती ९२ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११२२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.